श्रीनिवास ज रामानुज यांचे गणितातील योगदान हे अमूल्य असून ते एक महान गणितज्ञ होते असे प्रतिपादन डॉ. प्रेम राठोड यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव गणित विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे तसेच मंचावर उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळ्ये यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. प्रेम राठोड म्हणाले की, आपल्या प्रतिभेने आणि समर्पणाने त्यांनी गणिताच्या क्षेत्रात केवळ अद्भुत असे शोध लावले नाही तर भारताला अतुलनीय वैभव मिळवून दिले. ते लहानपणापासूनच विलक्षण प्रतिभावान होते त्यांनी स्वतः गणित शिकले आणि त्यांच्या ह्यातीत गणिताची ३३८४ प्रमेय संकलित केली. यापैकी बहुतेक प्रमेय बरोबर सिद्ध झाली. त्यांनी आपल्या गणिती [illegible]च्या

**दै तरुण भारत**



अध्यक्षीय समारोप करताना

बळावर आणि बीजगणिती ज्ञानाच्या अद्वितीय प्रतिभेच्या बळावर अनेक मूळ पारंपारिक परिणाम शोधून काढले. रामानुजन यांना शाळेमध्ये प्रश्न विचारण्याची फार आवड होती. त्यांचे प्रश्न कधी– कधी शिक्षकांना खूप त्रासदायक वाटायचे. त्यांचे स्थूल शरीर आणि कुतुहलांनी चमकणारे डोळे ही त्यांची वेगळी अशी ओळख होती. अशा या महान गणितज्ञाने गणिताच्या क्षेत्रामध्ये अतुलनीय असे काम केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की शालेय काळातच त्यांनी महाविद्यालयीन स्तरावरील गणिताचा अभ्यास केला होता. एकदा त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की शाळेत घेतलेल्या परीक्षेचे निकष रामानुजन यांना लागू होत नाहीत. कारण त्यांची बुद्धिमत्ताच तितकी चाणाक्ष होती. हायस्कूलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी गणित आणि इंग्रजीमध्ये चांगले गुण मिळवण्यासाठी सुब्रमण्यम शिष्यवृत्ती मिळवली. घरची परिस्थिती अत्यंत बिकट असतानाही त्यांनी स्वतः अभ्यास करून घरची परिस्थिती सुधारण्यासाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या जीवावर गणिताच्या क्षेत्रामध्ये मोलाचे असे कार्य केले. ते फक्त आपल्या देशाचा अभिमान नसून जागतिक स्तरावर ही त्यांचे गणिताच्या क्षेत्रामध्ये भरीव असे कार्य असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय कार्यक्रमाधिकारी डॉ. तात्याराम सोंडगे यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर यांनी केले तर आभार डॉ. युवराज मुळ्ये यांनी मानले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक, व प्राध्यापक–प्राध्यापिका, कार्यालयीन अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



**माजलगाव : सिद्धेश्वर महाविद्यालयात श्रीनिवास रामानुजन यांची जयंती साजरी करण्यात आली.**

## सिद्धेश्वरमध्ये रामानुजन जयंती साजरी

**माजलगाव** : श्रीनिवास रामानुजन हे महान गणितततज्ज्ञ होते असे प्रतिपादन डॉ. प्रेम राठोड यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात गणित विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रामानुजन यांची जयंती गुरूवारी (ता. २२) साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य सुहास मोराळे होते. उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये यांची उपस्थिती होती. डॉ. राठोड म्हणाले, रामानुजन यांनी गणित क्षेत्रात विविध शोध तर लावलेच परंतु भारताला अतुलनीय वैभव मिळवून दिले असल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. तात्याराम सोंडगे, सूत्रसंचालन डॉ. विकास बोरगावकर यांनी केले.




**दि.26 डिसेंबर 2022 रोजी HIV/ AIDS युवक-युवतींची भूमिका या विषयावर बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाचे प्रकल्प समन्वयक श्री. सुहास कुलकर्णी यांचे व्याख्यान संपन्न झाले.**

रिपोर्टर

Wednesday 28-12-2022

# एच.आय.व्ही. ची बाधा टाळण्यासाठी शारीरिक सुरक्षितता महत्वाची- सुहास कुलकर्णी



माजलगाव(रिपोर्टर):- एच.आय.व्ही.ची बाधा टाळण्यासाठी शारीरिक सुरक्षितता महत्त्वाची असल्याची प्रतिपादन बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाचे प्रकल्प समन्वयक श्री. सुहास कुलकर्णी यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आय.सी.टी.सी. विभाग ग्रामीण रुग्णालय, आय.सी.टी.सी. विभाग जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित एच.आय.व्ही.एड्स मध्ये युवक-युवतीची भूमिका या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्रा तर प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. अंजली अकोलकर, आय.सी.टी.सी. चे समन्वयक शहाबुद्दीन शेख, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गजानन रुद्रवार, कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रेम राठोड, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये,प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री. सुहास कुलकर्णी म्हणाले की जगाच्या तुलनेत पाहता भारतामध्ये आजही एच.आय.व्ही. व एड्सची बाधा होण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण आपल्या भारतामध्ये या रोगाविषयीचा प्रचार-प्रसार म्हणावा तेवढा समाजामध्ये झालेले नाही. डॉ. अंजली अकोलकर यांनीही आपल्या मनोगतामध्ये या महाभयंकर रोगाविषयीची कारणे व त्यावरील उपाय योजना याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी व उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना म्हणाले की तरुणांमध्ये अशा महाभयंकर रोगाविषयी आताच जाणीव जागृती झाली तर भविष्यात होणाऱ्या दुष्परिणामापासून ही तरुणाई वाचली जाईल व योग्य ती खबरदारी समाजातील तरुण घेतील. प्रास्ताविक शहाबुद्दीन शेख यांनी केले.




संकेत

Tuesday 2022/12/27

# एच.आय.व्ही.ची बाधा टाळण्यासाठी शारीरिक सुरक्षितता महत्वाची- सुहास कुलकर्णी

माजलगाव दि.२६ (बातमीदार): एच.आय.व्ही.ची बाधा टाळण्यासाठी शारीरिक सुरक्षितता महत्त्वाची असल्याची प्रतिपादन बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाचे प्रकल्प समन्वयक सुहास कुलकर्णी यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आय.सी.टी.सी. विभाग ग्रामीण रुग्णालय माजलगाव व आय.सी.टी.सी. विभाग जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एच.आय.व्ही.



एड्स मध्ये युवक-युवतीची भूमिका या विषयावर आयोजित व्याख्याना प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्ना तसेच मंचावर प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.अंजली अकोलकर, आय.सी.टी.सी.चे समन्वयक शहाबुद्दीन शेख, माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक गजानन रुद्रवार, कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रेम राठोड, उपप्राचार्य डॉ.युवराज मुळ्ये,प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सुहास कुलकर्णी म्हणाले की जगाच्या तुलनेत पाहता भारतामध्ये आजही एच.आय.व्ही. व एड्सची बाधा होण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण आपल्या भारतामध्ये या रोगाविषयीचा प्रचार-प्रसार म्हणावा तेवढा समाजामध्ये झालेले नाही. हा रोग होण्याची जी वेगवेगळी कारणे आहेत त्यांची माहिती देखील समाजातील बऱ्याच लोकांना नसल्यामुळे या रोगास ते बळी पडत आहेत. असुरक्षित शारीरिक संबंधाद्वारे किंवा एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीचे रक्त दुसऱ्या व्यक्तीला दिल्याने किंवा एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीच्या

(पान दोन वर...

दिव्य मराठी

बीड जिल्हा 04-01-2023

# सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेत यशस्वी व्हावे

प्रतिनिधी | माजलगाव

मुलींनी आयुष्यात काहीतरी घडायचे असेल तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन डॉ.स्वाती कुलकर्णी यांनी केले.

सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे उपस्थित होते. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, एकविसाव्या शतकामध्ये आज महिला खूप प्रगत झालेल्या आहेत. यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांती करावीत. मुलींनी कुठेही मागे पडता कामा नये, असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, वेळप्रसंगी समाजाकडून हीन वागणूक मिळाली असताना देखील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले. प्रास्ताविक डॉ. विकास बोरगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रेम राठोड यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळ्ये,प्रा.लक्ष्मीका ंत सोन्नर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्याप किा व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक-स्वयंसेविका व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

रिपोर्टर

Wednesday 04-01-2023

# मुलींनी सावित्रीबाईंचा आदर्श घ्यावा-डॉ.स्वाती कुलकर्णी

माजलगाव(रिपोर्टर): आयुष्यात काही बनायचे असेल तर मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा असे आवाहन डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी केले.

सिध्देश्वर महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतीने आयोजित फुले जयंती कार्यक्रमात मंगळवारी ता. ३ बोलत होत्या. अध्यक्षस्थांनी प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांची उपस्थिती होती. बोलतांना श्रीमती डॉ. कुलकर्णी म्हणाल्या की, एकविसाव्या शतकामध्ये आज महिला प्रगत झालेल्या आहेत परंतु विज्ञान युगातआपण जगत असतांना काही गोष्टींचा तिरस्कारही केला पाहिजे. फॅशनच्या नावाखाली दुनिया भरकटत चालली असल्याने मुलींनी यातुन सावरण्याची गरज असल्याचे सांगीतले. प्रास्ताविक डॉ. विकास बोरगावकर यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी तर आभार डॉ. प्रेम राठोड यांनी मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळ्ये, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांचेसह महाविद्यालयातील प्राध्यापक - प्राध्यापिका व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक - स्वयंसेविका उपस्थित होत्या.

**दि. 03 जानेवारी 2023 रोजी राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला शिक्षकदिन म्हणून साजरी करण्यात आली**.

दैनिक महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
लोकाशा
05JAN2023

# मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा आदर्श घ्यावा- डॉ.स्वाती कुलकर्णी

हारकी निमगांव, दि.५ (लोकाशा न्युज):– मुलींनि आयुष्यात काहीतरी घडायचे असेल तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा असे प्रतिपादन डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, एकविसाव्या शतकामध्ये आज महिला खूप प्रगत झालेल्या आहेत परंतु विज्ञान युगात आपण जगत असताना काही गोष्टींचा तिरस्कारही केला पाहिजे. काही गोष्टी आपण सोडावयास हव्यात. फॅशनच्या नावाखाली आज ही दुनिया भरकटीत चालली आहे.



त्यामध्ये मुलीही थोड्या वेगळ्या दिशेने वाटचाल करत आहेत. यावरून आपल्या भारतीय संस्कृतीचे एकंदरीतच नुकसान होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.रमेश गटकळ यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रेम राठोड यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक–प्राध्यापिका व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक–स्वयंसेविका व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

• सांज दैनिक बीड •
वास्तव
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट
04 Jan 2023 - Page 4
Powered by www.softisky.com | 7972361040

▸उर्वरित पान २ वर होते तसे न करता छत्रपती संभाजी

# मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा – डॉ . स्वाती कुलकर्णी



माजलगाव / प्रतिनिधी

मुलींनी आयुष्यात काहीतरी घडायचे असेल तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा असे प्रतिपादन डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे उपस्थित होते. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, एकविसाव्या शतकामध्ये आज महिला खूप प्रगत झालेल्या आहेत परंतु विज्ञान युगात आपण जगत असताना काही गोष्टींचा तिरस्कारही केला पाहिजे. काही गोष्टी आपण सोडावयास हव्यात. फॅशनच्या नावाखाली आज ही दुनिया भरकटीत चालली आहे. त्यामध्ये मुलीही थोड्या वेगळ्या दिशेने वाटचाल करत आहेत. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, वेळप्रसंगी समाजाकडून हीन वागणूक मिळाली असताना देखील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय कार्यक्रमाधिकारी

▸उर्वरित पान २ वर

रिपोर्टर
Friday 13-01-2023

# आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये प्रसार माध्यमांचे मोलाचे योगदान–डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर



माजलगाव(रिपोर्टर): आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका मोलाची असल्याचे प्रतिपादन डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व दर्पण दिनानिमित्त आत्मनिर्भर भारत आणि प्रसार माध्यमांची भूमिका या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य विष्णुपंत कुलकर्णी हे तर प्राचार्य प्रो. सुहास मोराळे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की आज भारतामध्ये वेगवेगळे क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात जो बदल झालेला आहे त्या बदला पाठीमागे प्रसार माध्यमांची भूमिका ही मोलाची ठरली आहे. कोरोना काळामध्ये पुण्यातील सिरम इन्स्टिट्यूटने कोविशिल्ड ही लस संपूर्ण जगाला पुरवली. भारत बायोटेक नावाच्या कंपनीने को- वॅक्सिन ही लस जगाला पुरवली. केमिकल, फार्मासिटिकल क्षेत्रामध्येही भारत जगाला मार्गदर्शन करतो आहे. रेमडीसेवर सारखे इंजेक्शन असेल किंवा मिसाइल, टेक्नॉलॉजी आय. एन.एस. विक्रांत सारखे भारतीय बनावटीचे जहाज असो किंवा नाग, त्रिशूल, अग्नि,ब्रह्मोस्त्र सारख्या क्षेपणास्त्र क्षेत्रामध्ये ही भारताने अतुलनीय अशी प्रगती केली आहे. अध्यक्षीय समारोपात विष्णुपंत कुलकर्णी म्हणाले की आज भारताने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आमुलाग्र अशी प्रगती केली आहे. प्रसार माध्यमांच्या योग्य प्रचार– प्रसारामुळे ती सर्व प्रगती सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचे काम प्रभावीपणे केले जाते. प्रास्ताविक प्राचार्य सुहास मोराळे यांनी केले. यावेळी शहरातील पत्रकारांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. तात्याराम सोंडगे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळ्ये, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगांवकर व महाविद्यालयातील प्राध्यापक– प्राध्यापका यांनी परिश्रम घेतले.

**दि.12 जानेवारी 2023 रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त स्वा..सावरकर महाविद्‌यालयाचे उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांचे व्याख्यान संपन्न झाले.**

यांचे लोंढाळ यांनी स्पष्ट केले. पत्रकार बांधवांना २४ तास फिल्डवर अध्यक्ष समारोप करताना ज्येष्ठ वैजनाथ घायतिडक यांनी परिश्रम घेतले.

# आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये प्रसार माध्यमांचे मोलाचे योगदान–डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर

माजलगाव दि.१२ (वार्ताहर): आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका मोलाची असल्याचे प्रतिपादन डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व दर्पण दिनानिमित्त आत्मनिर्भर भारत आणि प्रसार माध्यमांची भूमिका या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य विष्णुपंत कुलकर्णी हे तर प्राचार्य प्रो. सुहास मोराळे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की आज भारतामध्ये वेगवेगळे क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात जो बदल झालेला आहे त्या बदला पाठीमागे प्रसार माध्यमांची भूमिका ही मोलाची ठरली आहे. कोरोना काळामध्ये पुण्यातील सिरम इन्स्टिट्यूटने कोविशिल्ड ही लस संपूर्ण जगाला पुरवली. भारत बायोटेक नावाच्या कंपनीने को- वॅक्सिन ही लस जगाला पुरवली. केमिकल, फार्मासिटिकल क्षेत्रामध्येही भारत जगाला मार्गदर्शन करतो आहे. रेमडीसेवर सारखे इंजेक्शन असेल किंवा मिसाइल, टेक्नॉलॉजी आय.एन.एस. विक्रांत सारखे भारतीय बनावटीचे जहाज असो किंवा नाग, त्रिशूल, अग्नि,ब्रह्मोस्त्र सारख्या क्षेपणास्त्र क्षेत्रामध्ये ही भारताने अतुलनीय अशी प्रगती केली आहे. अध्यक्षीय समारोपात विष्णुपंत कुलकर्णी म्हणाले की आज भारताने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आमुलाग्र अशी प्रगती केली आहे. प्रसार माध्यमांच्या योग्य प्रचार– प्रसारामुळे ती सर्व प्रगती सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचे काम प्रभावीपणे केले जाते. प्रास्ताविक प्राचार्य सुहास मोराळे यांनी केले. यावेळी शहरातील पत्रकारांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. तात्याराम सोंडगे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळ्ये, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगांवकर व महाविद्यालयातील प्राध्यापक– प्राध्यापका यांनी परिश्रम घेतले.




**दि.25 जानेवारी 2023 रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रा.जीजाराम बागल यांचे व्याख्यान संपन्न.**

# देशहितासाठी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे गरजेचे - प्रा. जिजाराम बागल

माजलगाव दि.२५ प्रतिनिधी : देशहितासाठी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रा. जिजाराम बागल यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रासेयो विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रेम राठोड, प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदानाच्या दिवशी आपणास सार्वजनिक सुट्टी देते कारण सर्वांनी मतदान करावे व योग्य ते उमेदवार निवडून यावा. परंतु आपण जर ज्ञानाने समृद्ध असलो, शिकलो असलो तरी आपण हे कर्तव्य न बजावता, मतदान न करता आपण सुट्टी आहे म्हणून वेगवेगळया पर्यटन स्थळी फिरायला जाऊन त्या दिवशी वेगळ्या पद्धतीने सुट्टी साजरी करतो. याचाच परिणाम मग निवडून येणार उमेदवार हा योग्य निवडला जात नाही मग पाच वर्षे त्याच्याच नावाने आपण खडे फोडत बसतो. अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रेम राठोड म्हणाले की, आपला भारत हा लोकशाही प्रधान देश आहे परंतु कधीकधी ह्या लोकशाही प्रधान देशात नागरिक असे का वागतात याची चिंता जाणवते. कोणतेही राष्ट्रीय कर्तव्य बजावताना आपण स्वार्थ आणि हिताचा विचार करतो आणि आपणच आपल्या पायावर दगड मारून घेतो. मतदानाच्या दिवशी जागरूकपणे योग्य उमेदवार जर आपण निवडले तर वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये विकास झाल्याशिवाय राहणार नाही. असे सांगितले. प्रास्ताविक सय्यद खिजर यांनी केले. सुत्रसंचालन राधिका उरणकर तर आभार सौरभ रांजवण यांने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर, डॉ. तात्याराम सोंडगे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक-स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.




लोकमत



# विद्यार्थ्यांनी करिअरच्या नवीन संधी शोधाव्यात

## 'सिद्धेश्वर'च्या बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**माजलगाव :** २१ व्या शतकात सोशल मीडियाचा वापर प्रचंड वाढला आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा डोळसपणे वापर कसा करायचा हे शिकले पाहिजे. करिअरच्या नवनवीन संधी त्यातून शोधत आपला मार्ग तयार केला पाहिजे. सायबर क्राईमचा धोका ओळखून जबाबदार नागरिक म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी समाजात वावरण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माजलगाव शहराचे पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुभेच्छा समारंभप्रसंगी अध्यक्ष म्हणून फराटे बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन रुद्रवार होते. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व योगी अरविंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रास्ताविक प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा दिला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी आजच्या स्पर्धेच्या जगात अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न करणे गरजेचे आहे. करिअरमध्ये पुढे जाताना संयम व चिकाटी ही अत्यंत महत्त्वाची आहे. तरच यश आपल्या पदरात पडते, असे फासाटे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राघवेंद्र मुळी यांनी केले. आभार प्रा. बाळासाहेब परळकर यांनी मानले.

Hello Beed
Page No. 4 Feb 05, 2023
Powered by: erelego.com

दिव्य लोकप्रभा

Sun 05-02-2023
Page No. 4

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा योग्य वापर करत नवीन करियरच्या संधी शोधाव्यात-धनंजय फराटे

**माजलगाव । प्रतिनिधी**

आज २१ व्या शतकात सोशल मीडियाचा वापर प्रचंड वाढला आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा डोळसपणे वापर कसा करायचा हे शिकले पाहिजे करियर च्या नव नवीन संधी त्यातून शोधत आपला मार्ग तयार केला पाहिजे तसेच सायबर क्राईम चा धोका ओळखून जबाबदार नागरिक म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी समाजात वावरण्याची गरज आहे असे प्रतिपादन माजलगाव शहराचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात इयत्ता १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुभेच्छा समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन रुद्रवार हे होते.प्राचार्य डॉ सुहास मोराळे,उपप्राचार्य प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांची प्रमुख उपस्थिती होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व योगी अरविंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.



वैयक्तिक पद्य प्रा अंकुश साबळे यांनी सादर केले.प्रास्ताविक करताना उपप्राचार्य प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी बारावी साठी घेतलेल्या परीक्षा, स्पर्धा यांचा आढावा विशद केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना किमान कौशल्याचे छोटे अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळणारे आहेत. त्यामुळे शासन स्तरावरील सॉफ्ट स्किल च्या कोर्सेस कडे लक्ष द्यायला त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील आठवणीना उजाळा देताना अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.तसेच १२वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास कृतज्ञता व्यक्त करत भेटवस्तू प्रदान केल्या आहेत.१२ वी च्या सराव परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. तसेच कु. पायल गिलडा या विद्यार्थिनीचा विभागीय क्रीडा स्पर्धेतील यशामुळे मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन रुद्रवार यांनी पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी अध्यक्षीय समारोप करतांना म्हटले की, विद्यार्थ्यांनी आजच्या स्पर्धेच्या जगात अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज कार्य करतांना व करियर मध्ये पुढे जाताना संयम व चिकाटी ही अत्यंत महत्वाची आहे. तरच यश आपल्या पदरात पडणार आहे असे म्हटले. मान्यवरांचे आभार प्रा. बाळासाहेब परळकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राघवेंद्र मुळी यांनी केले.कार्यक्रमाची सांगता सामूहिक शांती मंत्राने झाली. या शुभेच्छा समारंभास १२ वी च्या बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक कर्मचारी उपस्थिती होती.

लोकप्रश्न

12/2/2023



माजलगाव-पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. युवराज मुळ्ये, डॉ.कमलकिशोर लड्डा, डॉ.सीताराम इंगोले, डॉ.गंगाधर उषमवार, श्री.उतरेश्वर आनेवार आणि महाविद्यालयातील कर्मचारी







**दि. 15 फेब्रुवारी 2023 रोजी संत सेवालाल महाराज जयंती साजरा करण्यात आली.**

रिपोर्टर
Monday 20-02-2023

# संघटन कौशल्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवराय - डॉ.केदारनाथ मालू

माजलगाव, (रिपोर्टर):- संघटन कौशल्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवराय होय असे प्रतिपादन डॉ. केदारनाथ मालू यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात ज्ञानोपासक मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित शिवजयंती व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह विष्णूपंत कुलकर्णी, प्राचार्य सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर गवते यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. मालू म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये जे कार्य केले आहे ते



खरेच सन्मान जनक व वाखणण्याजोगे आहे. त्यांच्या जीवनातील एक- एक प्रसंग म्हणजे आपल्या अंगावर शहारे आणणारे असे आहेत. एकंदरीतच आपली प्रजा सुखी व्हावी यासाठी आयुष्यभर ते झटत राहिले असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात विष्णुपंत कुलकर्णी म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी जो भगवा ध्वज आपणास दिला आहे ते खरे हिंदुत्वाचे प्रतीक आहे. पुरंदराच्या तहात मिर्झाराजे जयसिंग यांना औरंगजेबाला भेटायलाही त्यांनी प्रवृत्त केले. वेळप्रसंगी आपल्यावर येणाऱ्या प्रसंगांना ते सामोरे जात राहिले. म्हणूनच वेगवेगळ्या लढायामध्ये ते जिंकू शकले. प्रास्ताविक प्राचार्य सुहास मोराळे यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी खुर्पे तर आभार लाखे याने मानले. कार्यक्रमासाठी ज्ञानोपासक मंडळातील सदस्य डॉ. ज्ञानेश्वर गवते, प्रा. अशोक होके, प्रा. जिजाराम बागल यांनी पुढाकार घेतला.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
19FEB2023

# संघटन कौशल्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवराय-डॉ.मालू

माजलगाव, दि.१९ (लोकाशा न्युज):- संघटन कौशल्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवराय होय. असे प्रतिपादन डॉ.केदारनाथ मालू यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव ज्ञानोपासक मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती कार्यक्रम प्रसंगीच्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह विष्णूपंत कुलकर्णी तसेच मंचावर प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर गवते यांची उपस्थिती होती.

डॉ. केदारनाथ मालू म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये जे कार्य केले आहे ते



खरेच सन्मान जनक व वाखणण्याजोगे आहे. त्यांच्या जीवनातील एक- एक प्रसंग म्हणजे आपल्या अंगावर शहारे आणणारे असे आहेत. एकंदरीतच आपली प्रजा सुखी व्हावी यासाठी आयुष्यभर ते झटत राहिले. त्या काळात मोगलांचे प्रचंड असे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. अशा प्रस्थापिताविरुद्ध लढायचे म्हणजे मोठी ताकद लागते हे जाणूनच त्यांनी आपल्या प्रजेमध्ये एक-एक मावळा एकत्र करून त्यांच्यामध्ये स्वराज्याचे स्फुरण निर्माण केले. फलटणचे निंबाळकर घराणे असो किंवा जावळीचे मोरे घराणे असो त्यांच्याविरोधातही त्यांनी गुलामगिरी विरुद्ध लढाई केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.साक्षी खुर्पे हिने केले. तर आभार चि. लाखे याने मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानोपासक मंडळातील सदस्य डॉ. ज्ञानेश्वर गवते, प्रा. अशोक होके प्रा. जिजाराम बागल यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिपोर्टर
Wednesday 12-04-2023

हजारी, उपनगराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, नगर   पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते   कारभार या प्रकरणातून स्पष्टपणे उघड झाला आहे.

# महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्यात मोलाचे योगदान–संजय जवळेकर

माजलगाव (रिपोर्टर): महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्यात मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह श्री. संजय जवळेकर यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव अविष्कार सेलच्या वतीने आयोजित महात्मा फुले यांच्या जयंती कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, तसेच मंचावर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री. अभय कोकड तसेच यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना श्री. संजय जवळेकर म्हणाले की महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरून स्वतः आपल्या पत्नीला पहिले शिक्षित केले व समाजातील इतर महिलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रोत्साहित केले. शिक्षणाची गंगोत्री घरोघरी जावी म्हणून समाजाचा अन्याय, अत्याचार सहन करून त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नीनेही समाज सुधारण्याचे मोलाचे असे कार्य केले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहास मोराळे म्हणाले की आज स्त्री वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये जी चमकदार कामगिरी करत आहे त्याचे संपूर्ण श्रेय हे महात्मा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना जाते. त्या काळामध्ये महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला नसता तर आज समाजात वेगळे चित्र पहावयास मिळाले असते. समाजाचे खरे उद्धारक तेच असतात जे भविष्यात होणाऱ्या बदलाचा विचार करून आपले पाऊल टाकतात. म्हणूनच महात्मा फुले यांचे कार्य हे अनन्यसाधारण असे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविष्कार सेलचे प्रमुख डॉ. सिताराम इंगोले यांनी केले. त्यांनीही याप्रसंगी महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आविष्कार सेलचे सदस्य प्रा. अशोक होके यांनी केले तर आभार डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, कार्यालय अधिक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार यांनी परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
14APR2023

# राष्ट्र उभारणीच्या कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान – रवींद्र जोगदंड

माजलगाव, दि.१४ (लोकाशा न्युज):– राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन वस्तू व सेवा कर विभागाचे राज्यकर उपायुक्त रवींद्र जोगदंड यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव यू.जी.सी. व रूसा विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती प्रसंगीच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड तसेच मंचावर विद्यापीठ आधिसभा सदस्य योगिता होके पाटील, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप व संयोजक डॉ. कमलकिशोर लड्डा यांची उपस्थिती होती.



कृष्णाजी केळुस्कर गुरूजी यांच्या विचाराने प्रभावी झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची त्यांच्यामुळेच एक सैद्धांतिक बैठक निर्माण झाली. संत कबीर व संत साहित्याचा प्रभावाने त्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. प्राचीनकाळी जाती परंपरा खूप जाचक आणि कठीण होत्या. त्यातून आपला समाज बाहेर पडावा तो विकसित व्हावा यासाठी आयुष्यभर बाबासाहेब आंबेडकर यांनी मेहनत घेतली. जातिभेद निर्मूलन जोपर्यंत समाजात होत नाहीत तोपर्यंत खर्या अर्थाने समाजाचा उद्धार होणार नाही. यासाठी वेगवेगळ्या अनुषंगाने त्यांनी कधी सत्याग्रह तर कधी शांततेच्या मार्गाने समाजाचे परिवर्तन करण्याचा संकल्प केला. कोलंबिया विद्यापीठात जाऊन पीएच.डी. करत असताना देखील त्यांना वेगवेगळे अनुभव तेथे आले. इंडोनेशिया, फिलिपाईन्स, पाकिस्तान, श्रीलंका यासारख्या देशाच्या घटना लिहिणारे घटनाकार यांचा जर विचार केला तर आज त्या देशांची स्थिती काय झाले आहे हे पाहून खरोखरच आपल्या देशाची घटना महान असल्याचे सिद्ध होते. भारतात केंद्रोत्सारी राज्यपद्धती प्रबळ पद्धतीने राबविले जावे यासाठी राज्याने आपली सत्ता अशा प्रकारे वापरावी की जिथे केंद्राचा कोणताही अडथळा येऊ नये. अशा प्रकारची व्यवस्था त्यांनी निर्माण केली. अशा महामानवाचा आदर्श आजच्या पिढीने घेण्याची खर्या अर्थाने आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय संयोजक डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी केला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.सुहास मोराळे व विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. योगिता होके पाटील यांनी आपली मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार डॉ.युवराज मुळये यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप डॉ.गजानन होन्ना यांनी शांतीमंत्राने केला.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक–प्राध्यापिका, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**रिपोर्टर**

Saturday 15-04-2023

# राष्ट्र उभारणीच्या कार्यात डॉ. बाबासाहेबांचे मोलाचे योगदान -रवींद्र जोगदंड

माजलगाव, (रिपोर्टर):-राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन वस्तू व सेवा कर विभागाचे राज्यकर उपायुक्त रवींद्र जोगदंड यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात यू.जी.सी. व रूसा विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड हे तर विद्यापीठ आधिसभा सदस्य योगिता होके पाटील, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, प्रशांत भानप व डॉ.कमलकिशोर लड्डा यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना रवींद्र जोगदंड म्हणाले की, कृष्णाजी केळुस्कर गुरूजी यांच्या विचाराने प्रभावी झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची त्यांच्यामुळेच एक सैद्धांतिक बैठक निर्माण झाली. संत कबीर व संत साहित्याच्या प्रभावाने त्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. प्राचीनकाळी जाती परंपरा खूप जाचक आणि कठीण होत्या. त्यातून आपला समाज बाहेर पडावा तो विकसित व्हावा यासाठी आयुष्यभर बाबासाहेब आंबेडकर यांनी मेहनत घेतली. जातिभेद निर्मूलन जोपर्यंत समाजात होत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने समाजाचा उद्धार होणार नाही.



यासाठी वेगवेगळ्या अनुषंगाने त्यांनी कधी सत्याग्रह तर कधी शांततेच्या मार्गाने समाजाचे परिवर्तन करण्याचा संकल्प केला.

अध्यक्षीय समारोपात अभय कोकड म्हणाले की, सर्व आंदोलने शांततेच्या मार्गात कशी पार पडतील याविषयी बाबासाहेबांचा आदर्श समाजाने घेण्याची गरज आहे. प्रास्ताविक डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य सुहास मोराळे, डॉ. योगिता होके पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी तर आभार डॉ. युवराज मुळ्ये यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, डॉ. गजानन होन्ना, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

07MAY2023

# मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा लोक राजा छत्रपती शाहू महाराज-प्रा.मुळी

माजलगांव,दि.६ (लोकाशा न्युज):- राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त श्री सिद्धेश्वर महाविद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. राघवेंद्र मुळी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे प्रेरणादायी होते व सामाजिक कार्याचे प्रेरणास्थान होते. कोल्हापुर संस्थानाचे राजे राज्यकारभार करताना लोकहितांची कामे त्यांनी केली. शिक्षणाची गंगोत्री सर्व सामान्य लोकांपर्यंत त्यांनी पोहचवली. बहुजन समाजातील विषमता दूर करणे, वसतिगृह निर्माण करणे, उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करणे, प्रशिक्षित शिक्षक निर्माण करणे, कुस्ती आखाडे, अस्पृश्यता निर्मूलन, मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी दुरदृष्टीने कार्य केले. खऱ्या अर्थाने मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा



राजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज आहेत असे प्रतिपादन प्रा. मुळी यांनी काढले. यावेळी शै. वर्ष २०२२-२३ चा ११ वी वर्गाचा महाविद्यालयाचा निकाल जाहीर करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डॉ युवराज मुळ्ये, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार, यांच्यासह बहुसंख्य प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

# रिपोर्टर

Sunday 07-05-2023

# मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा लोक राजा छ.शाहुमहाज-प्रा.राघवेंद्र मुळी

माजलगाव(रिपोर्टर): राजर्षी शाहु महाराजांचे कार्य हे प्रेरणादायी होते व सामाजिक कार्याचे प्रेरणास्थान होते. कोल्हापुर संस्थानाचे राजे राज्यकारभार करताना लोकहितांची कामे त्यांनी केली. मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा लोक राजा छ. शाहुमहाज होते असे प्रतिपादन प्रा राघवेंद्र मुळी यांनी केले.



राजर्षी छत्रपती शाहु महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा. राघवेंद्र मुळी बोलत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डॉ युवराज मुळ्ये, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, कार्यालयीन अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार यांची उपस्थिती होती. बोलतांना प्रा. मुळी म्हणाले कि, राजर्षी शाहु महाराजांनी शिक्षणाची गंगोत्री सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचवली. बहुजन समाजातील विषमता दूर करणे, वसतिगृह निर्माण करणे, उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करणे, प्रशिक्षित शिक्षक निर्माण करणे, कुस्ती आखाडे, अस्पृश्यता निर्मूलन, मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी दुरदृष्टीने कार्य केले. खऱ्या अर्थाने मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा राजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज आहेत असे असे सांगितले. यावेळी शै. वर्ष २०२२-२३ चा ११ वी वर्गाचा महाविद्यालयाचा निकाल जाहीर करण्यात आला. कार्यक्रमास बहुसंख्य प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

दिव्य मराठी

## बीड जिल्हा 07-05-2023

# शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी : प्रा. मुळी

**प्रतिनिधी** | माजलगाव

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे प्रेरणादायी होते व सामाजिक कार्याचे प्रेरणास्थान होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे राज्यकारभार करताना लोकहिताची कामे त्यांनी केली, असे प्रतिपादन प्रा. राघवेंद्र मुळी यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा. राघवेंद्र मुळी बोलत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. डॉ युवराज मुळ्ये, प्रा.



राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

लक्ष्मीकांत सोन्नर, कार्यालयीन अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार यांची उपस्थिती होती. प्रा. मुळी म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाची गंगोत्री सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचवली. बहुजन समाजातील विषमता दूर करणे, वसतिगृह निर्माण करणे, उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय स्थापन करणे, प्रशिक्षित शिक्षक निर्माण करणे, कुस्ती आखाडे, अस्पृश्यता निर्मूलन, मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी दूरदृष्टीने कार्य केले. खऱ्या अर्थाने मानवतेचे तत्वज्ञान कृतीतून जगणारा राजा म्हणजे छत्रपती शाहू महाराज आहेत.

यावेळी शै. वर्ष २०२२-२३ चा ११ वी वर्गाचा महाविद्यालयाचा निकाल जाहीर करण्यात आला. कार्यक्रमास बहुसंख्य प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.